RNI MAHMAR
36829-2010

ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal

**UGC-CARE LISTED**

## Folk Literature & Folk Media

FEBRUARY 2020













Executive Editor : Dr. Subash Nikam

Principal,
Mahatma Gandhi Vidymandir's
Karmaveer Bhausaheb Hiray
Arts, Science and Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon Dist. Nasik (MS)

Co- Editor : Prof. Arjun G. Nerkar

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Address : 'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515

Scanned by CamScanner

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

UGC CARE LISTED JOURNAL

February - 2020

## Folk Literature & Folk Media

Executive Editor
Dr. Subhash Nikam
Principal
Mahatma Gandhi Vidyamandir's
Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College, Nimgaon,
Tal. Malegaon, Dist. Nashik [M.S.] INDIA

Co-Editors
Assisst Prof Arjun G. Nerkar
Dr. Kalyan S. Kokane
Dr. V. D. Suryawanshi

Chief Editor
Dr. Nanasaheb Suryawanshi

PRATIK PRAKASHAN, 'PRANAV, RUKMENAGAR, THODGA ROAD AHMEDPUR,

DIST. LATUR,-433515, MAHARASHTRA

Published by – Dr. Subhash Nikam, Principal, KBH College Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nahik, MS

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The authosr shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Price: Rs. 1000/-



Scanned by CamScanner

ISSN : 2229- 4929
February - 2020

**Mahatma Gandhi Vidyamandir's**

**Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science and Commerce College**
**Nimgaon, Tal. Malegaon, Dist.-Nasik [M.S.] India- 423212**

**National Conference on**
**Folk Literature & Folk Media**

**13th & 14th February 2020**

**Sponsored By**
**Savitribai Phule Pune University, Pune**

**Convener**
**Prin. Dr. Subhash Nikam**

**Co-ordinator**
**Prof. Arjun G. Nerkar**

**http://kbhnimgaoncollege.com**



Scanned by CamScanner



BHAUSAHEB HIRAY

MAHATMA GANDHI VIDYAMANDIR
Society Regd. (Act 1860) Regd. No. 2766 Dt.21/02/1952
& Bombay Public Trust (Act 1950) Regd. No. F27 Dt. 23/08/1954

Dr. Prashant Hiray
B.A., LL.B.
General Secretary



# PREFACE

National Conference on '***Folk Literature& Folk Media*** on 13th and 14th February, 2020 organized by the P.G. Department of Marathi, Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science and Commerce College Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nashik, Maharashtra sponsored by BCUD, Savitribai Phule Pune University, Pune will be attended by the researchers from every corners of India belongs to several disciplines will truly be a big boost to our teachers, students, research scholars, stakeholders, and policy makers in keeping themselves abreast of milestones in their areas of expertise.

I hope this conference will definitely be a significant contribution to inculcate research culture and open several avenues of research among the teachers and students, delegates, and participants of this conference. We can catalyze the transfer of innovative knowledge of Folk Literature& Folk Media among the investigators.

I am sure that the deliberations at the conference will encourage the students, teachers, researches in the field of education, higher education and research on Folk Literature & Folk Media. Folk literature is the culture and history of the society. It was tremendous media for entertainment and knowledge in the primitive days

Fairy Tales and Folk Stories really cultivated the minds of to make them civilized. This Oral Tradition connected the ordinary men and women with the universe. The Universe has been tried to make more beautiful through these moralistic, miraculous and imaginative labour of ordinary people to foster humanity in the minds of children to the adult ones.

On behalf of the General Secretary of Mahatma Gandhi Vidyamandir, and Adivasi Seva Samitti I appreciate the efforts taken by the Principal, Dr.Subhash Nikam, Vice Principal Dr.Kalyan Kokane, Prof. Arjun Nerkar Coordinator & Dr. Valmik Suryawanshi Co-cordinator of the conference and his colleagues to organize this National Conference. I welcome all the delegates, participants, investigators, researchers and the scholars across India.

**Dr.Prashant Hiray**
General Secretary,
Mahatma Gandhi Vidyamandir,
Panchavati, Nasihk

Nashik Office : 6th Floor, K.B.H. Dental College & Hospital Premises,
Mumbai-Agra Road, Panchavati, Nashik - 422 003.
Ph. : (0253) 2628143 / 144, Fax : (0253) 2621335. Website : www.mgv.org.in

Scanned by CamScanner



## FROM THE PRINCIPAL'S DESK....

Mahatma Gandhi Vidyamandir, Panchavati, Nashik was established in the year 1952 under the dynamic leadership of Late Karmaveer Bhausaheb Hiray, the maker of Historic Tenancy Act. In 1961, under the visionary guidance of Loknete Vyankatrao Hiray, M. G. Vidyamandir started colleges imparting higher education. Presently under the able leadership of Hon'ble Samajshree Dr. Prashant V. Hiray, General Secretary and Hon'ble Dr. Aapoorv P. Hiray, Ex-Member of Legislative Council, Maharashtra State more than 250 educational units ranging from primary to postgraduate, research centers and from traditional to professional education are managed by the trust. With this glorious background, Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science and Commerce College Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nashik, MS is an emerging leading educational institutes of Rural area in Nashik District of Maharashtra providing education from UG to PG students. P.G. Department of Marathi of the college has organized the National Conference on ***Folk Literture & Folk Media*** on 13th and 14th February, 2020

Literature has always kept an aim to create such a beautiful world which would be worth living for one and all. Folk Stories has actually laid the foundation for gaining this humanitarian objective.

Discussions and deliberations in this conference on ***Folk Literture & Folk Media*** will open new vistas of research in Litarture & Languages. It will provide great view for educationist, scholars, and researchers, farmers & the students.

I warmly welcome all the participants, delegates and research scholars across India for this Conference. I also congratulate to the authors and contributors whose papers have been selected by the review committee for including in this issue for publication.

**Dr. Subhash N. Nikam**
**Principal**
**Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science and Commerce College**
**Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nashik, MS**



Scanned by CamScanner

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors | Page No. |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला माध्यमे : काही निरीक्षणे<br>प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत | 8-12 |
| 2 | गोमंतकीय लोकगीतातील समाजदर्शन : एक चिकित्सक मूल्यांकन<br>डॉ. हनुमंत चंद्रकांत चोपडेकर | 13-17 |
| 3 | लोकसाहित्य आणि समाजजीवन<br>प्रा. डॉ. संदीप विठ्ठलराव सांगळे, | 18-21 |
| 4 | गोव्यातील लोककला<br>प्रा. जयप्रभू कांबळे | 22-25 |
| 5 | लोकसाहित्यातील समाजजीवन<br>प्रा. ए. जी. नेरकर | 26-29 |
| 6 | आदिवासी जमातीची संस्कृती व लोककला : एक चिकित्सक अभ्यास<br>प्रा.डॉ. आहिरे संगिता मुरलीधर | 30-25 |
| 7 | उत्तर महाराष्ट्रातील आदिवासी लोकसाहित्यातील लोककलांचा अभ्यास<br>डॉ.पोर्णिमा बोडके शरद तुकाराम आंबेकर | 36-39 |
| 8 | खानदेशातील कवींच्या कवितेतून घडणाऱ्या लोकसंस्कृतीचा एक चिकित्सक अभ्यास<br>सहायक प्रा.आत्माराम तुकाराम चिमकर | 40-43 |
| 9 | समाज प्रबोधन करणारे लोकसाहित्यातील लोकसंस्कृतीचे उपासक<br>प्रा. देशमुख बिभीषण | 44-48 |
| -10 | लोककला - तमाशातील वगनाट्य<br>डॉ. देविदास एन. शिंदे | 49-51 |
| 11 | "जागरण –गोंधळ विधीनाटयाचे स्वरूप"<br>प्रा. डॉ. सुरेश विनायक जाधव | 52-57 |
| 12 | साक्री तालुक्यातील अहिराणी ओवीगीतातून प्रतिबिंबीत झालेले 'मारोती' या ग्रामदैवताचे चित्रण<br>प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके | 58-60 |
| 13 | अहिराणी भाषेतील ओवीगीते<br>प्रा. डॉ. अरुण पाटील | 61-63 |
| 14 | भवाडा : एक लोककला प्रकार<br>प्रा. डॉ. बबनराव दौलतराव पवार | 64-66 |
| 15 | 'लोकसाहित्य आणि संस्कृती'<br>डॉ.गजानन भामरे | 67-69 |





Scanned by CamScanner

 RNI: MAHMAR-36829-2010 ISSN : 2229- 4929
February - 2020

# लोकसाहित्यातील समाजजीवन

प्रा. ए. जी. नेरकर
मराठी विभाग
कर्मवीर भाऊसाहेब हिरे,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय निमगाव, ता. मालेगाव, जिल्हा नाशिक( महाराष्ट्र )

प्रस्तावना :- लोकसाहित्य ही लोकमानसाची अभिव्यक्ती असते. आदिकाळापासून चालत आलेल्या व प्रत्येक व्यक्तीच्या मनात घटक रूपाने असलेले हे लोकमानस त्यांच्या जीवनातून जीवन जगण्याच्या पद्धतीतून व्यक्त होत असते. आज मानवाचा विकास झालेला असला तरी त्यांच्या जीवनपद्धतीत आदिमतेचा काही अवशेष जतन करून ठेवलेले दिसतात. प्रसंगी हे अवशेष परंपरा,प्रथा,रुढी, लोकविश्वास आणि विधी इत्यादीतून हे व्यक्त होताना दिसतात. यांचाच अर्थ असा की लोकसाहित्याच्या निर्मितीला व सातत्याला हेच लोकमानस कारण असते. म्हणूनच लोकसाहित्य म्हणजे लोकमानसाची कृती-उक्ती असे म्हटले जाते. या दृष्टीने लोकसाहित्याचा अभ्यास हा लोकमानसाच्या अविष्काराचा अभ्यास ठरतो. लोकवाङ्मय काय आणि लोककला काय यांच्या मागे लोकमानसच असते.

लोककलांच्या उगमाचा शोध घेता असे दिसते की, लोकजीवनातील जवळ-जवळ सर्वच कलांचा उगम यातू श्रद्धेतून झालेला आहे. कालांतराने यातू श्रद्धा गळून धर्मश्रद्धा लोककलात आली. धर्माच्या आणि मंदिराच्या आश्रयाने कलांची जोपासना होऊ लागल्याचे दिसते. नृत्य, संगीत ,चित्र ,शिल्प, मूर्ती इत्यादी कला धर्म आणि मंदिर यांच्या आश्रित बनलेल्या दिसतात. आजही काही विधीच्या प्रसंगी नृत्य, नाट्य, संगीत इत्यादी कलांची जोपासना करताना पाहावयास मिळते. मानवी विकासाच्या प्रत्येक टप्प्यात मागील काही घटक ते श्रद्धेचे असतील, धरणाचे असतील, कलातील असतील ते गळून पडतात तर काही त्यात नव्याने येतात. काही मूळचे रूप बदलून येतात. असे असले तरी आदिमांचे काही अवशेष जपून ठेवण्याची त्यांच्यात एक शक्तीही असते. ती कलेच्या माध्यमातून व्यक्त होत असतात. नृत्य कलेतून आदिम जीवनाचे काही अवशेष आजही आपल्याला शोधता येतात.

भारतीय संस्कृतीने ज्ञान, भक्ती व संस्कारांना सर्व प्रथम स्थान दिले आहे. संस्कारांचा प्रसार लोकसाहित्याच्या माध्यमांद्वारे ही झाला आहे. आधुनिक काळात संस्कार असता आपले पण आणि परंपरांचा अभाव दिसून येत आहे. लोकसाहित्य आणि लोकमाध्यमे यांच्या मार्फत गावापासून ते शहरापर्यंत भारतीय संस्कृतीचा प्रचार झालेला आहे. जन्मापासून ते मरणापर्यंत सोहळा संस्कारांना गीत रूपात लोकसाहित्य हा एक महत्वाचा ठेवा आहे. लोकसाहित्यामध्ये भारतीय समाजाचे दर्शन होते. वर्तमान युगात मानवी विकासामध्ये भारतीय मुल्य, संस्कार, रुढी, परंपरा इत्यादींसाठी लोकसाहित्य आणि लोकमाध्यमांची भूमिका महत्वपूर्ण आहे.

लोकसाहित्यात लोकजीवनाला एक वेगळे महत्व आहे. लोकसाहित्य हे लोकांच्या अवघ्या जीवनाशी बांधलेले साहित्य असल्याने त्यातून व्यापक स्वरूपाच्या जीवन जाणिवा प्रकट होतात. या जाणिवा कधी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक स्वरूपाच्या असतात. लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या लोकसमजूती, लोकश्रद्धा, धर्मविधी, रुढी, प्रथा, लोकभ्रम, सण-उत्सव याशिवाय रोजच्या जगण्यातील वस्तू, कला, कारागिरी, लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे या सर्व घटकांचा समावेश लोकसाहित्यात होतो. लोकसाहित्य निर्मिती ही एका व्यक्तीची निर्मिती नसते तर ती समूहाची निर्मिती असते. त्यातून सामूहिक जीवनाचा अविष्कार घडतो. विश्वनाथ शिंदे म्हणतात, "लोकसाहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत व्यक्तींचा सहभाग असला तरी ती व्यक्ती आपल्या व्यक्तिगत भावभावनांची अभिव्यक्ती न करता सर्व समूहभावनेचा



Scanned by CamScanner

अविष्कार करीत असते. त्यामुळे ती निर्मिती व्यक्तीची न राहता त्या संबंध समूहाची ठरते. लोकसाहित्याचे आव्हान एका व्यक्तीमनाला केलेले नसून समूहाला केलेले आव्हान असते. त्यामुळेच सारा समाज लोकसाहित्याचा स्वीकार करतो".

लोकजीवनाची सामाजिकता ही लोकसाहित्याच्या अभिव्यक्ती मधून लक्षात येते. लोकसाहित्याची प्रेरणाच मुळात सामाजिकतेत रुजलेली असल्यामुळे त्यात समाज जीवनाचे चित्रण उमटणे स्वभाविक आहे. एकूणच लोकसाहित्याच्या धारणा, प्रेरणा, वर्तमान पद्धती, जीवन जगण्याची धडपड, लोकव्यवहार, जीवनरीत आदींचे प्रतिबिंब लोकसाहित्यात उमटते. लोकसाहित्यातून प्रकट होणारा अनुभव हा त्या-त्या समाज विश्वाच्या अनुभवातून साकारलेला असतो. म्हणूनच लोकजीवनाचे सामाजिक मन हे लोकसाहित्यातून शोधता येते.

**सामाजिक जीवन** :- लोकसाहित्याची निर्मिती समाज जीवनात होते. लोकसाहित्याचा प्रचार आणि प्रसारही समाजजीवनात होतो. कुटुंब हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. कुटुंबातील संस्कार सोबत घेऊनच माणसाच्या सामाजिक जीवनात सुरुवात होते. कुटुंबात जन्माला आल्यापासून ते मृत्यूपर्यंत जे काही व्यवहार पार पाडले जातात त्या सर्व बाबींचे प्रकटीकरण लोकसाहित्यात पाहावयास मिळते.

लोकसाहित्यात कौटुंबिक भावबंधाची चित्रण आलेले असते. नातेसंबंधात एकमेकांविषयी असणारी आस्था, कर्तव्य, प्रेम, कटुता, द्वेष या भावनिक जिव्हाळयांवर आधारलेल्या भावबंधाचे चित्रण विशेषतः स्रियांची ओवीगीते, म्हणी, उखाणे यातून प्रकट झालेली दिसते. स्रियांचे कुटुंबातील स्थान, सासुरवास, हुंडा पद्धती, बालविवाह, बहुपत्नीत्व, विषम-विवाह, वैधव्य, पतिव्रत्य, तिच्या सासर-माहेरची श्रीमंती-गरिबी सामाजिक बंधनांचे मानपमानापानच्या प्रसंगाचे चित्रण अत्यंत खुबीदारपणे लोकसाहित्यातून रेखाटले आहे.

लोकजीवनात नीतीमूल्यांचे पालन काटेकोरपणे केले जाते. दुसऱ्याला दिलेल्या वचनाला, शब्दाला फार महत्त्व असते. व्यक्तीच्या स्वैर वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी समाजाने काही मर्यादा घालून दिलेल्या असतात. मर्यादांचे उल्लंघन होऊ नये म्हणून काही अलिखित नियम संकेत सांगितले जातात. या नियमांचा प्रचार आणि प्रसार लोकसाहित्यातून होतो. समाजास अमान्य असणाऱ्या गोष्टींचा निषेध लोकसाहित्यातून दर्शविला जातो. परिणामी समाजात कसे वागावे याचे शिक्षण लोकसाहित्यातून मिळते.

**धार्मिक जीवन** :- **धार्मिक लोकजीवन आणि लोकसाहित्य यांचा निकटचा संबंध आहे.** धर्माचा आधार लोक विश्वास आहे. मानवामध्ये धर्माचा उगम पाहण्यासाठी लोकसाहित्य ही महत्त्वाम साधन आहे. लोकसाहित्यातून व्यक्त होणारा समाज हा देवधर्म, कुळाचार, विधी साजरे करणारा, पाप-पुण्य, शकून-अपशकून मानणारा आहे. लोक माणसांच्या धार्मिक भावना व देवदेवतांविषयीच्या श्रद्धा लोककथा, लोकगीते यातून पाहावयास मिळतात. लोकजीवनात विविध प्रकारचे धार्मिक विधी साजरे केल्या जातात. ग्रामदेवतांच्या उपासनापद्धती, धर्मविधी, संस्कार विधी इत्यादी अनेक धार्मिक विधी लोकजीवनाशी किती एकरूप आहेत. याचे प्रतिबिंब लोकसाहित्यात उमटते. देव देवतांची गाणी, विधींशी संबंधित असलेली स्रियांची गाणी, लोकसंस्कृतीच्या उपासकांची गाणी या गीतातून लोकांच्या धर्मभावना, श्रद्धा प्रत्ययास येतात.,लोकजीवनात काही धार्मिक विधी सामूहिक स्वरुपात पार पाडले जातात. उदा. मरीआईचा गाडा गावाबाहेर नेण्याच्या विधी आचरणात संपूर्ण गाव सहभागी झालेला असतो. लक्ष्मीआई, खंडोबा, भैरोबा, म्हसोबा, मारिआई या ग्रामदेवता संबंधीचे चित्रण लोकसाहित्यात पाहावयास मिळते.

डॉ. स. रा. गाडगीळ लिहतात, "ब्राह्मणी संस्कृतीने प्रभावित झालेला अल्पसंख्यांक वरिष्ठ वर्ग सोडल्यास भारतीय ग्रामीण जीवनात आजही ग्रामदेवतांचे वर्चस्व आढळते. या ग्रामदेवता त्या आदिशक्तीचा प्रतिनिधी आहेत. या ग्रामदेवतांच्या पूजाविधीत कनिष्ठवर्गांना आणि विशेषत:स्रियांना महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या प्राथमिक शेतीचा व्यवसाय हेच त्यांचे चरितार्थसाधन. त्यांच्या आर्थिक जीवनात विशेष असे परिवर्तन शेकडो वर्षांत न झाल्याने त्यात प्राचीन देवतांची वर्चस्व त्यांच्या जीवनात टिकून राहील".



Scanned by CamScanner

लोकजीवनात आजही ग्रामदेवतेला संतुष्ट करण्यासाठी विधीपूर्वक कोंबडा कापला जातो. रेड्याचा बळी दिला जातो. ग्रामीण भागात उपजीविकेच्या साधनात आणि आर्थिक विकासात बदल न झाल्याने लोकजीवनात हे प्राचीन अवशेष टिकून आहेत, असे म्हणता येईल. याशिवाय नैसर्गिक आपत्ती व संकटे येऊ नये म्हणून लोक शांतीकर्म करतात. नवीन घराची वास्तूशांती करण्याची प्रथा आजही रूढ आहे. रोग बरा होण्याकरिता काही दैवी उपाय केले जातात. जसे तप, मंत्र, नवस, देव-सेवा इत्यादी एकंदरीत परंपरा चालत आलेल्या या मौखिक साहित्यातून देवधर्म, कुळाचार, परमेश्वरा विषयी श्रद्धा पहावयास मिळते. त्याचबरोबर लोकजीवनातील धार्मिक विधींचे संस्कारांचे रितीरिवाजांचे वर्णन लोकसाहित्यातून प्रकट होते. एवढेच नव्हे तर या सर्व बाबींचा जीवन जगण्यासाठी कशाप्रकारे उपयोग होतो हे लोकसाहित्यातून कळून येते. लोकजीवनाने धारण केलेल्या धर्माच्या श्रद्धा जाणिवा लोकसाहित्यातून व्यक्त होत राहतात.

**सांस्कृतिक जीवन :- लोकसाहित्यातून जे लोकजीवन प्रकट होते, त्यात समाजाच्या संस्कृतीचे अंग असते. लोकसाहित्याच्या माध्यमातून लोकसंस्कृती जतन केली जाते. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन आपणास घडते. याला कारण लोकसाहित्यात टिकून राहण्याची क्षमता आहे.** लोकसाहित्यातील या विशेषणामुळे एखादा लोकसमूह तेच पारंपरिक व सांस्कृतिक विशेष यांचे जतन करतो. या सांस्कृतिक व पारंपरिक विशेषणांच्या आधारे आपणास लोकसाहित्यातून लोकसंस्कृती दर्शन पाहावयास मिळते.

मराठी लोकसंस्कृतीत आणि या लोकसंस्कृती जोपासना करणाऱ्या मराठी लोकजीवनात, देव धर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आदर्श जीवनाची व दैवी गुणांची जोपासना करणारी मराठी लोकसंस्कृती वंदनीय आहे. परमेश्वरावर लोकांची असीम श्रद्धा, परमेश्वर हा दुःख दूर करणारा आणि दुःखितांना आश्रय देणारा, तसाच नवसाला पाहणारा या हेतूने परमेश्वराकडे पाहिले जाते. यातून अनेक विधी, उत्सव व नवस यांची निर्मिती झाली. यामधूनच लोकजीवनाला धार्मिकतेचा स्पर्श होतो.

लोकसाहित्यातून घडणारे लोकसंस्कृतीचे दर्शन वैशिष्ट्यपूर्ण असून प्राचीन संस्कृतीचे विशेषही लोकसाहित्यातून आढळतात. मराठी लोकसाहित्यातून ग्रामीण लोकजीवन संस्कृती आणि आचारविचार आधीचे स्वच्छ आणि स्पष्ट प्रतिबिंब पहावयास मिळते. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, भारतीय जीवन संस्कृतीचा मौलिक इतिहास म्हणजे लोकसाहित्य. लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या संस्कृतीचा अभ्यास करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "लोकसाहित्य ही आमच्या संस्कृतीची संपत्ती आहे. तिचे जतन व संवर्धन आम्हाला केले तर ती अत्यंत प्राचीन काळापासून हृदय सांभाळून ठेवलेला मूल्यवान ठेवा आहे".

मराठी लोकसंस्कृतीच्या घडणीत संतांचे ही अत्यंत महत्त्वाचे योगदान असल्याचे लोकसाहित्याच्या अभ्यासाने कळते. मराठी लोकजीवनाला आणि त्याच्या वाङ्मयाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. लोकांची परमेश्वरा विषयीची श्रद्धा आणि तळमळ व आदर्श जीवन जगण्याची ओढ, या भावनेतून संत लोक जीवनात मान्यता पावले. लोकजीवनात संतांना लोकप्रियता का प्राप्त झाली याविषयी रा. ची. ढेरे म्हणतात, "संतांना लोकांविषयी करूणा वाटते. त्यांना लोकधारणा उंचावण्याची एकसारखी तळमळ लागून राहिलेली दिसते. यावरून संतांना लोकमान्यता मिळून अशा संतांविषयी लोकमानसात नितांत श्रद्धा निर्माण झाली. या श्रद्धेतूनच लोकजीवनाला आदर्श ओढ लागली. या आदर्शाच्या ओढीतून मराठी लोकसंस्कृती भोवती एक तेजोवलय निर्माण झाले. लोकसाहित्यातून हे प्रगट झाले.

लोकसाहित्य मुळातच संस्कृती संवर्धक असल्याने ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिकतेने संक्रमित होत आलेले आहे. लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या विविध अंगांनी भरलेले आहे. त्यात लोकविधी, परंपरा, सण-उत्सव, उखाणे, लोकाचार, रुढी, विधी, लोकसमजुती इत्यादी संस्कृतीचे दर्शन पाहावयास मिळते.

लोकांच्या सामाजिक जीवनाचा अगदी जवळून अभ्यास करावयाचा असेल तर ते लोक साहित्यातच करणे महत्त्वाचे आहे. कारण लोकजीवनात मौखिक परंपरेने प्रचलित असलेला शाब्दविष्कार हा लोकसमूहाच्या जीवन संदर्भासह प्रतिबिंबीत झालेला असतो. लोकांचे आचा-विचार, त्यांचे रहाणीमान, त्यांच्या मनात रुजलेले संस्कार, त्यांच्या भावभावनांची अभिव्यक्ती, लोकसाहित्यातून होत



Scanned by CamScanner

असते. त्याच बरोबर लोकसाहित्यातून तत्कालीन समाज व्यवस्थेबरोबरच बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन संदर्भाच्या अनेक छटा उमटून येतात. लोकसाहित्य हे परिस्थितीनुसार बदलते. जीवनावश्यक संदर्भ स्वतःत सामावून घेत लोकजीवनाची अभिव्यक्ती करीत राहाते.

संदर्भ :-

१. लोकसाहित्य : रंग आणि रेखा - लेखक शरद व्यवहारे प्रकाशक आर बी सिंह विश्वभारती प्रकाशन धनवटे चेंबर्स सीताबर्डी नागपूर
२. लोकसाहित्यमीमांसा - भाग दुसरा डॉ विश्वनाथ शिंदे प्रकाशक - स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे
३. लोकवाङमय - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.



Scanned by CamScanner